MHWS080011562025

**रे. मु. नं. ८२/२०२५ मधील नि.क्र. १४ व १५ वरील एकत्रित आदेश**

प्रतिवादी क्र.०२ यांनी प्रस्तूतचे दोन्ही अर्ज त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा चौकशीचा आदेश रदद होउन प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांचेतर्फे लेखी जबाब दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत दिलेला आहे.

**०२.** दोन्ही अर्जातील प्रतिवादी क्र.०२ यांचे कथनानुसार, दिनांक ११.०८.२०२५ रोजी प्रतिवादीची तब्येत ठिक नसल्यामुळे ते न्यायालयात हजर झाले नाही त्यामुळे त्यांच्या विरुध्द एकतर्फा चौकशीचा आदेश पारीत झालेला असून आज रोजी प्रतिवादी क्र.०१ ते ०३ लेखी जबाब दाखल करत असल्याने प्रतिवादी क्र. ०२ यांचे विरुध्दचा एकतर्फा चौकशीचा आदेश रदद करावा अशी विनंती केली.

**०३.** सदर दोन्ही अर्जावर वादीचे लेखी म्हणणे मागविण्यात आले. वादीच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीस प्रतिवादी क्र.०२ यांना नोटीस न बजावता परत आल्याने पुन्हा नोटीस काढण्यात येउन बजावणी करण्यात आली. मात्र प्रतिवादी गैरहजर राहिल्याने त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारित झालेला आहे. प्रकरण लांबवण्याच्या हेतूने प्रतिवादी विलंब करीत असल्याने त्यास र.रु.५००० दंड आकारुन अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

**०४.** दोन्ही अर्ज वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तूतचा दावा निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र.०२ यांना दिनांक ११.०८.२०२५ रोजी नि.क्र.१२ नुसार समन्स बजावणी होउन देखील ते गैरहजर राहिल्याने दिनांक २६.०८.२०२५ रोजी एकतर्फा चौकशीचा आदेश पारीत झाल्याचे दिसून येते. त्यानंतर पुढील

नेमल्या तारखेस प्रतिवादी तर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असून अर्जातील कारणाबाबत कागदोपत्री पुरावा दिलेला नसल्याने अर्जातील कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादींना स्वत:चा बचाव मांडण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आवश्यक ठरते. त्यामुळे झालेल्या विलंबाबाबत ठराविक दंड आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**—: <u>आदेश</u> :—**

१ प्रतिवादी क्र.०२ यांचे प्रस्तुतचे दोन्ही अर्ज नि.क्र.१४ व १५ मंजूर करण्यात येतात.

२ प्रतिवादी क्र.०२ यांचे विरुध्दचा एकतर्फा चौकशीचा आदेश त्यांनी रक्कम रू. २००/— चा दंड वादींना देण्याच्या अटीवर माफ करणेत येतो. प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी दिलेला लेखी जबाब, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी सामील करुन घेण्यात येईल.

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2025.10.13 17:11:11 +0530

(पी. व्ही. सपकाळ)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर रिसोड

दिनांक — १३.१०.२०२५

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग<br>न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | एच.ए. उचाडे |
| निकाल तारीख | : | १३.१०.२०२५ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | १३.१०.२०२५ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | १४.१०.२०२५ |